मौ.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर आणि मौ.सावली, जि.चंद्रपूर येथे अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता नवीन शासकीय वसतीगृहे सुरू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्र. आवगृ-२०१९/प्र.क्र.२०/का-१२

मंत्रालय, मुंबई - ३२.
दि. ०८ मार्च, २०१९.

प्रस्तावना :-

आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखाली अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता राज्यात एकूण ४९५ शासकीय वसतीगृहे मंजूर असून त्यापैकी ४९१ वसतीगृहे कार्यरत आहेत . कार्यरत वसतीगृहांपैकी २८३ वसतीगृहे मुलांची व २०८ वसतीगृहे मुलींची आहेत .सर्व मंजूर ४९५ वसतीगृहांची एकूण क्षमता ६१,०७० इतकी असून कार्यरत असलेल्या ४९१ वसतीगृहांची क्षमता ५८,४९५ इतकी आहे .त्यापैकी १६७ वसतीगृहे शासकीय इमारतीत सुरू असून उर्वरित ३२४ वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत.

राज्यात विविध ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये, तंत्रनिकेतने, उच्च महाविद्यालये, अल्प मुदतीचे कौशल्य विकासावर आधारित महाविद्यालये, आय टी आय, अभियांत्रिकी महाविद्यालये इत्यादीची सोय झाली आहे. सदर महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या संख्येतही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. ग्रामिण तसेच दुर्गम क्षेत्रातून अनुसूचित जमातीचे विद्यार्थी हे तालुक्याच्या, जिल्हयाच्या व विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी शिक्षणासाठी येतात. मात्र आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना त्या ठिकाणी निवास, भोजन व शैक्षणिक खर्च परवडत नसल्याने त्यांना सदर सुविधा मोफत पुरविण्यासाठी आदिवासी विकास विभागाअंतर्गत शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश देण्यात येतो. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून वसतिगृह प्रवेशासाठी सरासरी ७५,००० विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त होत आहेत. यामुळे माध्यमिक व उच्च माध्यमिक, तसेच पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील प्रवेशासाठीच्या मागणीच्या प्रमाणात उपलब्ध प्रवेश क्षमता कमी पडत होती.

या प्रकरणी मौजे सावली व मौजे पोंभुर्णा येथे नवीन वसतीगृहे मंजूर करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी, विविध आदिवासी संघटना तसेच विद्यार्थ्यांकडून मागणी होत होती. सावली व पोंभुर्णा हे नक्षलग्रस्त, दरडोई उत्पन्न कमी असणारे, शुन्य उद्योग असलेले, मानव विकास निर्देशांकामध्ये मागास असलेले तालुके असल्याने याठिकाणी शासकीय वसतीगृहे सुरू केल्यास अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना तेथील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेणे सुलभ होईल या दृष्टीकोनातून मौजे सावली व मौजे पोंभुर्णा येथे नवीन वसतीगृहे मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. मौ.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर आणि मौ.सावली, जि.चंद्रपूर येथे अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता खालील यादीत नमूद केल्याप्रमाणे नवीन शासकीय वसतीगृहे सुरू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	क्षमता	मुलांचे / मुलींचे	वसतीगृह प्रकार	संख्या	ठिकाण
१	७५	मुलांचे	तालुकास्तरीय	१	मौ.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर
२	७५	मुलींचे	तालुकास्तरीय	१	मौ.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर
३	७५	मुलांचे	तालुकास्तरीय	१	मौ.सावली, जि.चंद्रपूर
४	७५	मुलींचे	तालुकास्तरीय	१	मौ.सावली, जि.चंद्रपूर

२. वसतीगृह व्यवस्थापनासाठी उच्चस्तर समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून खालीलप्रमाणे कर्मचारी आकृतीबंध प्रत्येक वसतीगृहनिहाय मंजूर करण्यात येत आहे.

पदाचे नाव	७ व्या वेतन आयोगाप्रमाणे level	७ व्या वेतन आयोगाप्रमाणे pay scale	एका वसतीगृहासाठी पदसंख्या	चार वसतीगृहासाठी पदसंख्या
गृहपाल	S१४	३८६००-१२२८००	१	४
कनिष्ठ लिपीक	S६	१९९००-६३२००	१	४
शिपाई	--	मानधन	१	४
पहारेकरी	--	मानधन	१	४
सफाईगार	--	मानधन	१	४
एकूण			५	२०

३. उपरोक्त प्रत्येक नवीन वसतीगृहाकरीता आवश्यक गृहपाल, लिपीक, शिपाई, पहारेकरी व सफाईगार अशा चार वसतिगृहांमध्ये एकूण २० पदांच्या वेतन/ भत्ते/ मानधन याकरीता वार्षिक आवर्ती रू. ५२.०० लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

४. उपरोक्त पदांपैकी गृहपाल व कनिष्ठ लिपीक ही पदे नियमित वेतन श्रेणीत भरण्यात यावीत. पहारेकरी , सफाईगार, शिपाई ही पदे मानधनावर भरण्यात यावीत किंवा ही कामे बाहयस्त्रोताव्दारे करण्यात यावीत.

५. वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांकरीता देय असलेल्या शैक्षणिक साहित्य, बेडिंग, गणवेश, छत्री, आहार, निर्वाह भत्ता, क्रिडा साहित्य इत्यादी बाबींसाठी एकूण ३०० विद्यार्थी संख्येकरीता अंदाजीत रू. १.३५ कोटी इतक्या वार्षीक आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

६. वसतिगृहात आवश्यक असलेले फर्निचर, विद्युतीकरण, वॉटर प्युरीफायर, जनरेटर, संगणक, उपकरण पुरवठा, वैद्यकीय सुविधा इ. बाबींसाठी ४ वसतिगृहांकरीता रू. ८०.०० लक्ष इतक्या एकवेळ खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

७. सुरूवातीस ही नवीन वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत सूरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच जागेची उपलब्धता व तद्नुषंगिक इतर बाबी पूर्ण करून टप्प्याटप्प्याने सदर वसतीगृहांचे बांधकाम करण्यात यावे. बांधकाम अंदाजपत्रकांच्या उपलब्धतेनुसार प्रस्तुत वसतीगृहांकरिता इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

८. उपरोक्त वसतीगृहे सुरू करण्यासाठी शासकीय जमीन उपलब्ध न झाल्यास खाजगी जमीनी खरेदी करण्यासाठी असलेल्या प्रचलित धोरणातील वित्तीय मर्यादेनुसार जमिनी खरेदी करण्यात याव्यात.

९. तसेच एखाद्या ठिकाणी शासकीय जमीन/खाजगी जमीन उपलब्ध न झाल्यास, वसतीगृहाच्या मंजूर आराखड्यानुसार खाजगी इमारत मिळत असतील तर अशा इमारती, सार्वजनिक बांधकाम विभागाने यासंदर्भात विहित केलेल्या धोरणानुसार व अटी आणि शर्तीनुसार शासनाच्या मान्यतेने खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०. या शासन निर्णयान्वये वसतीगृहाच्या संबंधित गृहपालांना उपरोक्त वसतीगृहातील कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर भत्ते तसेच वसतीगृहाच्या इतर खर्चासाठी लागणारी रक्कम काढण्यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

११. आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत/क्षेत्राबाहेरील सुरू करण्यात येणाऱ्या वसतीगृहांवरील खर्च मागणी क्र.टी.५, २२२५, अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, पंचवार्षिक योजनेंतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना -०२- अनुसूचित जमातीचे कल्याण-७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना व (०१) (५९) मुलांसाठी व मुलींसाठी शासकीय वसतिगृह (राज्यस्तर योजना) (कार्यक्रम) (२२२५ डी ७२५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा. मंजूर रकमेपेक्षा जादा खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

१२ हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.२७/व्यय १४ दि.२९/०१/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०३०८१९२८१३४७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.03.08 19:31:00 +05'30'

(सु.ना.शिंदे)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री, यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई

२) मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक (१० प्रती)
६) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
७) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर
८) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१०) महालेखापाल (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
११) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर
१२) जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, चंद्रपूर
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर
१४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर
१५) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) वित्त विभाग (व्यय-१४/अर्थ-३/ अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई
१७) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) कार्यासन अधिकारी, (का.११ व का१३.), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१९) निवडनस्ती (का.१२).